१८ व्या आणि १९ व्या अखिल भारतीय नवोदित साहित्य संमेलनाकरीता मुख्यमंत्री सहायता निधीमधून देण्यात आलेल्या रु.५.०० लक्ष इतक्या निधीच्या प्रतिपुर्तीस मंजूरी देणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्र.सासंअ-२०१२/२९६/प्र.क्र.६४/२०१२/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : ०५ डिसेंबर, २०१२.**

वाचा : १) मुख्यमंत्री सचिवालयाचे पत्र क्र.मुमंनि १११२/०४११०/२०१२, दिनांक ६ जून, २०१२,
२) शासन निर्णय, मराठी भाषा विभाग क्र.पूरक १०१२/३०४/प्र.क्र.६५/२०१२/भाषा-३, दिनांक २७ ऑगस्ट, २०१२.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राचे संस्कृतीधन संवर्धित करण्याचे उद्दीष्ट साकारण्याच्या दृष्टीने अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे गेल्या अनेक वर्षापासून साहित्याच्या प्रांगणात कार्यरत आहे. आजपर्यंत नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे म्हणून अनेक साहित्य संमेलने आयोजित केली जातात व अनेक उपक्रम संस्थेमार्फत राबविले जातात. याच पार्श्वभूमीवर दिनांक १९ ते २१ ऑगस्ट, २०११ या कालावधीत बारामती येथे व दिनांक १८ ते २० मे, २०१२ या कालावधीत सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या अनुक्रमे १८ व्या व १९ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनासाठीच्या खर्चाप्रित्यर्थ मुख्यमंत्री सहायता निधीमधून रु. ५.०० लक्ष इतके अर्थसहाय्य प्रतिपुर्तीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यामुळे सदरहू निधी मा.मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे यांचेतर्फे १८ व १९ वे अखिल भारतीय नवोदित साहित्य संमेलन अनुक्रमे बारामती, जिल्हा-पुणे व सोलापूर, जिल्हा-सोलापूर येथे आयोजित करण्यात आले होते. अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनासाठी मा.मुख्यमंत्री सहायता निधीमधून रु.५.०० लक्ष (रुपये पाच लक्ष मात्र) एवढे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले होते. सदर रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात पूरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन घेण्यात आला आहे. सदर रकमेची मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास प्रतिपुर्ती करण्यासाठी रु.५.०० लक्ष (रुपये पाच लक्ष मात्र) एवढया खर्चास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या संदर्भातील देयक आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, यांच्या स्वाक्षरीने तयार करुन अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना सादर करण्यात यावे.

....२/-

३. आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार / उपकोषागार अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येणा-या बिलासोबत जोडल्या जाणा-या कॉम्प्युटर स्लीपमध्ये गौण / उपशिर्षाच्या गणकयंत्र सांकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा.

४. यासंदर्भातील खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घेण्यात यावा व महालेखापालांच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठविण्याची कार्यवाही सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी करावी.

५. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. झेड एफ ०२, २२०५, कला व संस्कृती (००)१०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनेतर योजना (०१)(०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदाने (योजनेतर)" या लेखाशिर्षाखाली शासन निर्णय क्र.पूरक १०१२/प्र.क्र.६५/२०१२/भाषा-३, दिनांक २७ ऑगस्ट, २०१२ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. प्रतिपुर्तीसाठीचे सहायक अनुदान / आर्थिक सहाय्य हे कोणत्याही अटीशिवाय मंजूर करण्यात येत आहे. सदर प्रतिपूर्तीचा धनादेश "मुख्यमंत्री सहायता निधी" यांच्या नांवे काढण्यात यावा व तो धनादेश मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे सूपूर्त करुन त्याबाबतची पोच घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२१२०५१२००२५१५३३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सुरेश पेडगावकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. सह संचालक (निधी व लेखा), मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,
४. सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
९. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई,
१०. वित्त विभाग, (व्यय - ४ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई,
११. रोख शाखा, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. अवर सचिव / आस्था -३, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. **निवड नस्ती (भाषा-३).**